# आपल्या पूर्वजांना आनंद देणे



दाजी

पूज्य श्री लालाजी महाराज यांच्या

*153 व्या जयंतीनिमित्त संदेश*

*22, 23 आणि 24 जानेवारी 2026, कान्हा शांतिवनम्*



# आपल्या पूर्वजांना आनंद देणे

प्रियजनहो,

दरवर्षी जेव्हा वसंत पंचमी येते, तेव्हा माझ्या हृदयात असे काहीतरी घडते, जे मी शब्दांत पूर्णपणे व्यक्त करू शकत नाही. पिवळीधमक फुले, हवेत परतलेली सौम्य, सुखद ऊब आणि वसंतातील बहर, या सर्वांतून नवचैतन्याचा संदेश जाणवतो. परंतु आपल्यापैकी जे साधक हा आध्यात्मिक मार्ग अनुसरत आहेत, त्यांना या दिवशी, वसंतऋतूमधील सुगंधापेक्षाही एका आगळ्याच, विलक्षण सुगंधाचा दरवळ जाणवतो, कारण त्या दिव्य प्रकाशाने पृथ्वीवर अवतरण्यास हीच तिथी निवडली.

2 फेब्रुवारी 1873 रोजी, एका अशा महान विभूतीचा जन्म झाला, जी आध्यात्मिक अनुभूती घेण्याचा मार्ग कायमचा बदलून टाकणार होती. त्यावेळी जगाला याची कुणकुणही नव्हती. कशी असेल? महान विभूती कोणताही गाजावाजा न करता, शांतपणे, सर्वसामान्य रूपातच अवतरत असतात. पण निसर्गाला हे ज्ञात होते आणि त्या दिवशी निसर्गाने एक मूक वचन दिले.

त्या बालकाची माता एक साध्वी होती, जिचे हृदय भक्तिभावाने ओसंडून वाहणारे होते. एकदा, एक अवधूत भिक्षेसाठी त्यांच्या दारी आले. त्यांनी भोजनासाठी मासे हवेत अशी विनवणी केली, परंतु तिच्याकडे ते नव्हते,

कारण ती कधीही मांस शिजवत नसे किंवा ते ग्रहणही करत नसे. ईश्वरकृपेने, घरातील दक्ष सेविकेने शेजाऱ्यांकडून दोन मासे आणले आणि भोजनानंतर जेव्हा त्या साधूंनी विचारले, "तुझी व्यथा काय आहे?" तेव्हा ती शांत राहिली, पण तिच्या सेविकेने उत्तर दिले, "माझ्या या थोर स्वामिनीकडे सर्वकाही आहे परंतु अपत्य नाही."

ते संत, निळ्याशार आकाशापल्याड पाहत उद्गारले, "अरेरे!" काही मिनिटांनंतर प्रसन्नतेने, त्यांनी आपली बोटे स्वर्गाच्या दिशेने उंचावली आणि "एक... दोन... एक... दोन.." असे म्हणत ते तिथून निघून गेले; आणि त्यानंतर ते पुन्हा कधीही दिसले नाहीत.

पुढच्याच वर्षी, 1873 च्या वसंत पंचमीला, पहिल्या पुत्राचा जन्म झाला, आणि ते होते फतेहगडचे राम चंद्र, ज्यांना लालाजी म्हणूनही ओळखले जाते.

या महान विभूतीबद्दल मी असे काय बोलावे, जे यापूर्वी कधीही नमूद केले गेले नाही? अशा महापुरुषांचे वर्णन करण्याचा प्रयत्न कवींनी नेहमीच केला आहे, तसेच धर्मग्रंथांमध्येही त्यांचा उल्लेख आढळतो आणि कवी टेनिसनने लिहिलेले हे शब्द जणू काही त्यांच्याच संदर्भात असावेत, असे मला वाटते :

*तू मानव आणि दिव्य भासतोस,*<br>
*तू सर्वोच्च, परम पवित्र, पुरुषार्थ आहेस.*

तू मानवी आणि दिव्य अशा दोन्ही रूपांचा संगम भासतोस;<br>
तू मानवतेचे सर्वोच्च आणि परम पवित्र मूर्तिमंत रूप आहेस.

जे भल्याभल्यांना जन्मोजन्मी साध्य करता आले नाही, ते त्यांनी युवावस्थेतच, अवघ्या सात महिन्यांच्या कालावधीत साध्य केले. त्यांच्यासाठी तो दिव्य प्रकाश म्हणजे साध्य करण्याचे एखादे दूरवरचे ध्येय नव्हते, तर तो प्रकाश त्यांच्यामध्ये उपजतच, निसर्गतःच वसलेला होता. त्यांनी त्या प्रकाशाचा शोध घेतला नाही, कारण ते स्वतःच तो दिव्य प्रकाश होते.

लालाजींच्या माध्यमातून, मानवतेसाठी, विस्मृतीत गेलेला एक वारसा पुनरुज्जीवित झाला : तो म्हणजे प्राणाहुतीचे पवित्र विज्ञान होय, ज्याला प्राणस्य प्राण: अर्थात जीवनाच्या सारतत्त्वाचे संप्रेषण, असेही म्हटले जाते. हे गहन ज्ञान, अयोध्यापती प्रभू रामचंद्रांच्या जन्माच्या 73 पिढ्यांपूर्वी, पूज्य श्री ऋषभदेवजी महाराजांनी सर्वप्रथम जगासमोर मांडले. त्यांनीच जीवनाचा मूळ गाभा – सारतत्त्व प्रवाहित करण्याचे हे सूक्ष्म विज्ञान उलगडून दाखविले.

दिव्य प्राणाहुतीद्वारे, मानवी चेतनेच्या उच्च स्तरांची कवाडे उघडली जातात. साधकांना ब्रह्मविद्येची प्राप्ती संसाराचा त्याग करून संन्यास घेण्याने होत नाही; तर ती सुसंवादी एकात्मतेतून होते : सर्वसंगपरित्याग न करता, जगात पूर्णरूपेण वावरत असताना, अंतरी परमात्म्याशी जोडलेले राहून आणि त्याचबरोबर, गृहस्थ म्हणून भौतिक व आध्यात्मिक अशा दोन्ही कर्तव्यांचे पालन करून, त्यांच्यात समन्वय साधून. दिव्य प्राणाहुतीचा हा जिवंत प्रवाह, साधकाला वेगाने समाधीच्या उच्च अवस्थांमध्ये वारंवार घेऊन जातो; आणि हे अल्पावधीतच साध्य होते, प्रामाणिकपणे केलेल्या दैनंदिन साधनेने.

असे असूनही, जसजसा मानवी इतिहास उलगडत गेला तसतसे, हे मौल्यवान विज्ञान मानवी जाणिवेतून हळूहळू नाहीसे झाले आणि शेवटी लुप्त झाले. हे विज्ञान सुप्तावस्थेत राहिले होते, परंतु अखेर नियतीनेच हस्तक्षेप केला व लालाजी महाराजांनी या पवित्र प्रवाहाचा पुन्हा शोध लावला आणि त्याचे पुनरुज्जीवन केले, ज्यायोगे मानवतेकरिता परमोच्च ध्येयाप्रत जाण्याचा थेट,



दिव्य प्राणाहुतीद्वारे, मानवी चेतनेच्या उच्च स्तरांची कवाडे उघडली जातात. साधकांना ब्रह्मविद्येची प्राप्ती संसाराचा त्याग करून संन्यास घेण्याने होत नाही; तर ती सुसंवादी एकात्मतेतून होते : सर्वसंगपरित्याग न करता, जगात पूर्णरूपेण वावरत असताना, अंतरी परमात्म्याशी जोडलेले राहून आणि त्याचबरोबर, गृहस्थ म्हणून भौतिक व आध्यात्मिक अशा दोन्ही कर्तव्यांचे पालन करून, त्यांच्यात समन्वय साधून.

जिवंत मार्ग पुनर्स्थापित झाला. हीच लालाजींची देणगी होती : केवळ तत्त्वज्ञान आणि शिकवणच नव्हे, तर हृदयातून हृदयात आध्यात्मिक सारतत्त्वाचे प्रत्यक्ष संप्रेषण - प्राणाहुती.

आणि यानंतर त्या शिष्याचे आगमन झाले.

शाहजहाँपूरमध्ये, राम चंद्र (बाबूजी) नावाच्या युवकाने फतेहगडच्या या संतांविषयी ऐकले. लालाजींच्या केवळ नावाच्या उच्चारानेच त्यांच्या अंतरंगात एक तीव्र ओढ जागृत झाली आणि म्हणूनच ते त्यांना भेटण्यास निघाले. 3 जून 1922 रोजी झालेल्या त्या पहिल्या भेटीतच त्यांचे जीवन अंतर्बाह्य बदलून गेले.

त्यानंतर, त्यांनी लिहिले : "जेव्हा मी पहिल्यांदा माझ्या सद्गुरूंकडे आलो, तेव्हा मी अशी मनोवस्था अनुभवली जी अतुलनीय होती. आयुष्यातील त्या क्षणी मला ज्या ब्रह्मानंदाची अनुभूती झाली, त्याचे मी यथार्थ वर्णन करू शकत नाही. त्या दिवसापासून मी एक नवजीवन जगू लागलो. सर्व काही बदलून गेल्यासारखे वाटू लागले. हे जगच निराळे भासू लागले."

आणि अशा प्रकारे, एक अशी प्रेमकथा सुरू झाली, जी आध्यात्मिक इतिहासातील इतर सर्व कथांमध्ये सर्वश्रेष्ठ ठरावी. मी हे सहजच नव्हे तर पूर्ण गांभीर्याने बोलतो आहे; कारण लालाजी आणि त्यांच्या शिष्याच्या या प्रेमकथेतून जो भावबंध उलगडत जातो, त्यातून सामान्य भक्तिभाव नव्हे तर अलौकिक समर्पणभाव प्रतीत होतो. विद्यार्थ्याला आपल्या शिक्षकाबद्दल वाटणाऱ्या आदराच्या भावनेहूनही, हे खूप काही अधिक - शब्दातीत असे आहे, ज्यामुळे साक्षात स्वर्गीय महापुरुषही विस्मयाने स्तंभित झाले.

बाबूजी एकदा त्यांच्या बंधाबद्दल असे म्हणाले होते : "आमचे एकीकरण झाले होते, आम्ही आध्यात्मिकदृष्ट्या पूर्णत: एकरूप झालो होतो, आमची हृदये एकच झाली होती. आपल्या प्रियतमासाठी कोणतीही गोष्ट अत्त्युत्तम आहे असे वाटतच नाही; हे असे प्रेमच साधकाला स्वतःच्या मर्यादांच्या पलीकडे जाऊन, त्याला संतुष्ट करण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करण्यास प्रवृत्त करते."

मी हे सहजच नव्हे तर पूर्ण गांभीर्याने बोलतो आहे; कारण लालाजी आणि त्यांच्या शिष्याच्या या प्रेमकथेतून जो भावबंध उलगडत जातो, त्यातून सामान्य भक्तिभाव नव्हे तर अलौकिक समर्पणभाव प्रतीत होतो. विद्यार्थ्याला आपल्या शिक्षकाबद्दल वाटणाऱ्या आदराच्या भावनेहूनही, हे खूप काही अधिक - शब्दातीत असे आहे, ज्यामुळे साक्षात स्वर्गीय महापुरुषही विस्मयाने स्तंभित झाले.

दुसरीकडे, त्यांनी प्रांजळपणे म्हटले आहे की लालाजींशिवाय ते एक सेकंदही जगू शकत नाहीत. ते भौतिक रूपातील लालाजींबद्दल बोलत नव्हते, ज्यांचे दशकांपूर्वीच देहावसान झाले होते, तर ते अशा लालाजींबद्दल बोलत होते जे त्यांच्या श्वासाचा श्वास बनले होते, अर्थात प्राणस्य प्राण:, त्यांच्या जीवनाचे चैतन्य.

मी असे काहीतरी सांगू इच्छितो जे वाचताना प्रत्येक वेळी मला गहिवरून येते.

लालाजींच्या दिव्य संदेशांमध्ये बाबूजींबद्दल असे एक विधान आहे जे ऐकून आपण आश्चर्याने अगदी थक्क होतो. लालाजींचे असे निरीक्षण होते की, बाबूजींच्या सांसारिक जीवनातील पत्नीसोबतच्या अत्यंत उत्कट पवित्र क्षणांमध्येही, त्यांच्या हृदयातील गुरूची आठवण कधीच ढळली नाही, अगदी एका श्वासासाठीही नाही. त्यांच्या ऐहिक जीवनातील प्रत्येक परिस्थितीत त्यांचा हा बंध अतूट राहिला.

हेच खऱ्या अर्थाने ब्रह्मचर्य आहे. ब्रह्मचर्य म्हणजे ऐहिक जीवनाचा अभाव नव्हे, तर प्रपंचात राहूनही परमेश्वराच्या उपस्थितीचे सतत स्मरण. बाबूजींचे शरीर जगात कार्यरत असतानाही त्यांचे लक्ष मात्र सदैव त्या परमतत्त्वावरच स्थिर राहिले.

कोणते प्रेम असे अखंड स्मरण टिकवून ठेवू शकते? कोणती भक्ती असे सातत्य राखू शकते?

मी आता तुम्हाला एक विलक्षण गोष्ट सांगणार आहे.

21 मार्च 1945 रोजी, दिव्यलोकातून आलेल्या संदेशात एक संवाद आहे, जो सुवर्णाक्षरांमध्ये कोरून ठेवण्यासारखा आहे. त्यात प्रथम, महान आत्म्यांमधील जणू सिंहच अशा स्वामी विवेकानंदांनी बाबूजींवरील प्रेमाबद्दल सांगितले आहे आणि त्यानंतर भगवान श्रीकृष्णांनी बाबूजींच्या लालाजींवरील प्रेमाबद्दल सांगितले आहे.

स्वामी विवेकानंद म्हणाले, “आमच्या प्रभूंनी (लालाजींनी) तुमच्याबद्दलच्या प्रेमाविषयी जे काही सांगितले आहे ते निखळ सत्य आहे. ते तुमच्या प्रेमाच्या अग्नीत जळत आहेत. माझ्या संपूर्ण आयुष्यात असे उदाहरण मला कोठेही आढळले नाही.” पुढे ते म्हणाले, “लोक ईश्वरासाठी आपले घर सोडतात; पण त्यांनी तुमच्यासाठी त्यांचे घर - परमधाम सोडले. एका मुक्त आत्म्याकडून अपेक्षित असलेला हा सर्वात महान त्याग होय.” हे ऐकताच लालाजींनी त्यांना मध्येच रोखले व बाबूजींना सांगितले की हा संवाद त्यांनी डायरीत नोंदवून ठेवू नये.

लालाजी, जे एक मुक्त गुरू - महापुरुष होते, त्यांनी, आपल्या शिष्यासाठी, बाबूजींसाठी स्वत:चे भंडार - स्वर्गीय निवासस्थान सोडले. शिष्यासाठी गुरुमहात्मा खाली अवतरले, जणू स्वर्ग पृथ्वीकडे झुकला!

आणि त्यानंतर भगवान श्रीकृष्ण म्हणाले, आणि त्यांचे हे शब्द लिहिताना आजही माझे हात थरथरतात : “स्वामी विवेकानंदांनी जे सांगितले आहे ते शब्दशः खरे आहे, आणि हे लिहिण्यात काहीच गैर नाही की प्रेमाच्या बाबतीत, तुम्ही राधेलाही मागे टाकले आहे ....राधेचे प्रेम आता तुमच्या प्रेमापुढे, दुसऱ्या क्रमांकावर आहे.”

तुम्हाला याचा अर्थ समजला का? हजारो वर्षांपासून, राधेचे श्रीकृष्णावरील प्रेम हे भक्तीचे सर्वोच्च उदाहरण म्हणून साजरे केले जाते. राधा हे नावच दिव्य प्रेमाचा समानार्थी शब्द बनले आहे, आणि तरीही भगवान श्रीकृष्ण घोषित करतात की बाबूजींच्या लालाजींवरील प्रेमाने राधेच्या प्रेमालाही मागे टाकले!

परंतु ही कथा इथेच समाप्त होत नाही. तीन दिवसांनंतर, ती अशा परमोच्च बिंदूवर पोहचते ज्याला संपूर्ण सृष्टीच्या इतिहासात तोडच नाही.

24 मार्च 1945 या शुभदिनी, लालाजींनी अशी व्यवस्था केली की बाबूजींना साक्षात परमात्म्याकडून दीक्षा मिळावी. याचे साक्षीदार असलेल्या भगवान श्रीकृष्णांनी घोषित केले, "हा अत्यंत शुभ दिवस आहे की तुमच्या पूज्य सद्गुरूंनी तुम्हाला थेट दीक्षा प्राप्त करून दिली आहे. हीच खरी दीक्षा होय. सृष्टीच्या आरंभापासूनचे हे अशा प्रकारचे पहिलेच उदाहरण आहे."

स्वामी विवेकानंद पुढे म्हणाले, "परमात्म्याकडून तुमची थेट दीक्षा झाल्याची बातमी ऐकून, मी हर्षभरित झालो आहे. जगाच्या प्रारंभापासूनचे हे पहिलेच उदाहरण आहे."

आता क्षणभर थांबा आणि अशा गोष्टीचा विचार करा ज्यामुळे माझे हृदय आश्चर्याने सद्गदित होते.

या सर्वोच्च घटनेनंतर, लालाजींनी अत्यंत शांतपणे एक विधान केले जे त्यांच्या निःस्वार्थीपणाची गहनता दर्शवते. ते म्हणाले, "थेट दीक्षा देणे ही पूर्णपणे माझी पद्धती आहे. यापूर्वी कोणालाही याचे आकलन झाले नव्हते किंवा ती कधीही अंमलात आणली गेली नव्हती."

याचा अर्थ तुम्हाला उमजला का? लालाजींना ही पद्धती ज्ञात होती कारण तो त्यांचा स्वतःचा शोध होता. त्यांच्या हयातीत, त्यांना ज्या गोष्टीचे आकलन

या सर्वोच्च घटनेनंतर, लालाजींनी अत्यंत शांतपणे एक विधान केले जे त्यांच्या निःस्वार्थीपणाची गहनता दर्शवते. ते म्हणाले, "थेट दीक्षा देणे ही पूर्णपणे माझी पद्धती आहे. यापूर्वी कोणालाही याचे आकलन झाले नव्हते किंवा ती कधीही अंमलात आणली गेली नव्हती."

झाले होते व जी त्यांच्या आधी कोणत्याही आत्म्याला कधीच उमजली नव्हती, ती म्हणजे परमात्म्याकडून थेट दीक्षा प्राप्त करण्याची शक्यता. ते स्वतःसाठी याचा उपयोग करू शकले असते, पण त्यांनी तसे केले नाही. त्यांनी हे परम रहस्य स्वतःपाशीच राखून ठेवले आणि त्यांच्या प्रिय शिष्याची, अशा अवस्थेप्रत पोहचण्याची प्रतीक्षा केली, जेव्हा तो अशा देणगीचा स्वीकार करण्यास पात्र ठरेल. आणि जेव्हा बाबूजी त्या परमोच्च अवस्थेप्रत पोहचले, तेव्हा लालाजींनी आपल्या शिष्यासाठी त्या पध्दतीचा उपयोग केला.

गुरूंनी शिष्याला स्वतःच्या पुढे - प्रथमस्थानी ठेवले; स्वतः सक्षम असूनही, ते प्राप्त करण्याची आस कधीच न बाळगता, ते त्यांनी आपल्या शिष्याला बहाल केले. हे असे प्रेम तर्काच्या पलीकडचे होय; कदाचित मुलासाठी त्याग करणाऱ्या पालकांपेक्षा किंवा एखाद्या प्रियकराने आपल्या प्रेयसीला सर्वस्व अर्पण करण्यापेक्षाही हे श्रेष्ठ आहे. इथे गुरूंनी अंतिम आध्यात्मिक ठेवा शोधून काढला आणि तो शिष्याला बहाल करून, स्वतः मात्र पडद्याआड राहण्यातच धन्यता मानली. ज्यांची त्यांना कधीच आस नव्हती, अशी उच्च शिखरे, आपल्या शिष्याला गाठताना पाहून ते कृतकृत्य झाले.

आणि हा परम ठेवा बहाल केल्यानंतर लालाजी स्वतःबद्दल काय म्हणाले ? त्यांनी पर्शियन भाषेतील एक ओवी उद्धृत केली : "राजा महमूद गझनवी, जो हजारो गुलामांचा स्वामी होता, त्याला गरिबीने इतके ग्रासले की तो एका गुलामाचाही गुलाम बनला." आणि मग लालाजींनी केवळ एकच वाक्य त्याला जोडले व म्हणाले, "ही माझी अवस्था आहे."

सद्गुरूंचे सद्गुरू, ज्यांनी जे हरवले होते ते परत मिळविले, ज्यांच्या माध्यमातून ती प्राणाहुती समस्त मानवतेकडे प्रवाहित होते, अशा त्या महान विभूतीने स्वतःचे वर्णन "गुलामाचा गुलाम" असे केले, कारण त्यांनी आपल्या शिष्याला स्वतःपेक्षाही महान असे काहीतरी बहाल केले होते.

येथे आपण अशा एका गुरूच्या उदात्त प्रेमाचे साक्षीदार आहोत, ज्याने स्वतःला अंतिम फळापासून दूर ठेवले, जेणेकरून त्याच्या शिष्याला त्याची चव प्रथम

चाखता यावी. त्यांचे हृदय इतके विशाल होते की जेव्हा त्यांना सृष्टीतील सर्वात महान रहस्य सापडले, तेव्हा त्यांनी ते दुसऱ्याला भेट म्हणून दिले. पण याला त्याग म्हणणे म्हणजे खऱ्या गुरूचे हृदय ओळखता न येणे ठरेल. ही भेट लालाजींसाठी परमोच्च आनंदाचा स्रोत होती.

खरे तर, आपल्या शिष्याला आपल्यापेक्षा श्रेष्ठ होताना, पुढे जाताना पाहणे, आपल्या लाडक्या शिष्याचा उत्कर्ष पाहणे, आपले सर्वस्व अर्पण करणे आणि त्या बदल्यात केवळ पूर्णत्व अनुभवणे, हाच एका गुरूसाठी परमोच्च आनंद असतो. आई जेव्हा आपल्या मुलाला पाजते तेव्हा ती त्याग करत नसते किंवा नदी जेव्हा समुद्रात विलीन होते तेव्हा ती त्याग करत नसते. बाबूजींना परमात्म्याकडून थेट दीक्षा घेणारा पहिला मानव बनण्यास सक्षम करणे, ही गोष्ट लालाजींकरिता, एक पूर्तता तसेच परमानंदाचा स्रोत होती.



खरे तर, आपल्या शिष्याला आपल्यापेक्षा श्रेष्ठ होताना, पुढे जाताना पाहणे, आपल्या लाडक्या शिष्याचा उत्कर्ष पाहणे, आपले सर्वस्व अर्पण करणे आणि त्या बदल्यात केवळ पूर्णत्व अनुभवणे, हाच एका गुरूसाठी परमोच्च आनंद असतो.

हेच प्रेम आहे. हाच तो मार्ग आहे. आणि वसंत पंचमीला आपण याच गोष्टीचा उत्सव साजरा करतो.

लालाजी सध्याच्या युगाबद्दल एकदा म्हणाले होते, “ही वेळ आता पुन्हा प्रदीर्घ काळापर्यंत येणार नाही. या विशेष वेळेसाठी ही म्हण लागू होते : *‘मजनूने जंगलाला आपले घर बनवले, पण मी माझ्या घरालाच जंगल बनवले.’*” प्रख्यात प्रेमी मजनू हा प्रेमात वेडापिसा होऊन घरदार सोडून रानावनात भटकत राहिला. याउलट, सद्गुरू लालाजी महाराजांनी, आपल्या स्वर्गीय घराचे रूपांतर, आपल्या शिष्यासाठी तीव्र ओढीने व्याकुळ झालेल्या रानात केले.

भगवान श्रीकृष्णानी बाबूजींच्या पात्रतेचे वर्णन ‘अनुत्तर’ या शब्दात केले - सर्वोच्च श्रेणीची पात्रता. ते म्हणाले, “अशी पात्रता कधीतरी, अनेक वर्षांनंतर, शतकांनंतर किंवा सहस्रकांनंतर, अकस्मात जन्माला येते, ज्याला तोड नाही. अशी पात्र व्यक्ती ईश्वराच्या आज्ञेनेच जन्माला येते. तुम्ही त्याचे ज्वलंत उदाहरण आहात.”

जेव्हा 1931 मध्ये लालाजींनी आपला देह सोडला, तेव्हा बाबूजींनी लिहिले, “खरे सांगायचे तर, माझ्या सद्गुरूंचा देहांत झाला नाही, तर मला वाटले की मी स्वतःच मृत झालो आहे.” त्यानंतर बरीच वर्षे त्यांची डायरी बहुतांशी मूक होती. लालाजी जीवित असताना, इतके विपुल लेखन करणारे हे शिष्य, आपल्याच कोशात गेले; त्या अंधारात काहीतरी नवीन अंकुरित व्हायचे होते.

आणि मग, 1944 मध्ये त्यांचा संवाद पुन्हा प्रस्थापित झाला. ज्या नात्याचा अंत, शारीरिक मृत्यूने झाला असे भासत होते, त्या नात्याचे केवळ स्वरूप बदलले होते. लालाजींनी मार्गदर्शन करणे, प्राणाहुती देणे आणि प्रेम करणे सुरूच ठेवले. हा बंध मृत्यूच्या पल्याड गेला, हे प्रेम शरीराच्या पल्याड गेले आणि ती प्राणाहुती आजतागायत अखंड सुरूच आहे.

वसंत पंचमीच्या दिवशी मी हे सर्व तुम्हाला का सांगत आहे? जेणेकरून आपल्याला नेमके काय लाभले आहे, कोणती संधी लाभली आहे, याची तुम्हाला जाणीव व्हावी.

जेव्हा तुम्ही ध्यानाला बसता आणि तुमच्या हृदयात ते हळुवार स्पंदन अनुभवता, तेव्हा तुम्ही त्याच प्रवाहाला स्पर्श करत असता जो लालाजी आणि बाबूजी यांच्यामध्ये वाहत असे. जेव्हा तुम्हाला प्राणाहुती प्राप्त होते, तेव्हा तुम्ही ती देणगी - तो ठेवा स्वीकारत असता, जो अगणित पिढ्यांपासून काळाच्या ओघात लुप्त झाला होता आणि जो मानवतेसाठी पुन्हा प्राप्त झाला आणि जेव्हा तुम्हाला त्या अनामिक गोष्टीबद्दल अवर्णनीय अशी ओढ वाटते, तेव्हा तुम्हाला तुमच्या हृदयी तेच प्रेम प्रतिध्वनित होत असल्याची अनुभूती होते, ज्या प्रेमाने राधेच्या प्रेमालाही मागे टाकले आहे.

हा आपला वारसा - आपला ठेवा आहे, आपला जन्मसिद्ध हक्क आहे. तो आज आपल्याला उपलब्ध आहे कारण 1873 च्या वसंत पंचमीला एका अशा बालकाचा जन्म झाला जो पुढे, समर्थ गुरू बनला व एका शिष्याने त्या गुरूंवर प्रेमाचा वर्षाव केला, असे प्रेम, जे सृष्टीच्या प्रारंभापासून पाहू गेल्यास, अजोड ठरावे.

वसंतात फुलांना बहर येतो, जग स्वतःला नवचैतन्यमय करते आणि जे साधना करतात त्यांच्या हृदयातही तीच नवनिर्मितीची प्रक्रिया, दिवसेंदिवस, शांतपणे घडत राहते, कारण प्राणाहुतीचे कार्य अविरत सुरू असते.

या वसंत पंचमीला, मी पूज्य श्री लालाजी महाराजांच्या चरणी नतमस्तक होतो, ज्या महान विभूतीमुळे हे सर्व शक्य झाले. आणि मी पूज्य श्री बाबूजी महाराजांच्या चरणी नतमस्तक होतो, ज्यांच्या प्रेमाने एक असे द्वार उघडले जे कधीही बंद होऊ शकत नाही.

आपण या अमूल्य वारशाचे उत्तराधिकारी आहोत. केवढी ही महान परंपरा! आपल्या हाती केवढा मोठा खजिना सुपूर्द करण्यात आला आहे! आता आपल्यासमोर प्रश्न हा आहे : आपण या वारशाचे काय करावे?

चला, आपण या संधीचे सोने करूया. आपण आपल्या वडीलधाऱ्यांना - आध्यात्मिक सद्गुरूंना अधिक आनंदी, अधिक सुखी करूया. त्यांना दिव्यलोकातून खाली पाहू द्या व आपल्याला एकोप्याने राहताना, एकमेकांसह प्रेम व आदराच्या सद्भावनेने राहताना व ज्या तत्त्वासाठी ते जगले, ते आपणही जगताना पाहून आनंदाने नृत्य करू द्या.



चला, आपण या संधीचे सोने करूया. आपण आपल्या वडीलधाऱ्यांना - आध्यात्मिक सद्गुरूंना अधिक आनंदी, अधिक सुखी करूया. त्यांना दिव्यलोकातून खाली पाहू द्या व आपल्याला एकोप्याने राहताना, एकमेकांसह प्रेम व आदराच्या सद्भावनेने राहताना व ज्या तत्त्वासाठी ते जगले, ते आपणही जगताना पाहून आनंदाने नृत्य करू द्या.

या वडिलोपार्जित वंशपरंपरेचे जतन आणि संवर्धन करण्यासाठी आपण त्यांच्या मानकांनुसार वागणे, विचार करणे आणि कृती करणे आवश्यक आहे. या मार्गाचा स्पर्श झालेल्या प्रत्येक कुटुंबात सुसंवाद नांदो! साधक जिथे एकत्र जमतात, त्या प्रत्येक केंद्रात सुसंवाद असो. आध्यात्मिक समुदायांमध्ये कधीकधी शिरणारे क्षुल्लक भेद या वसंतातील उबदार उन्हात वितळून जावोत. आपण हे लक्षात ठेवूया की आपण सर्वजण एकाच वंशपरंपरेची मुले आहोत, एकाच प्राणाहुतीचे प्राप्तकर्ते आहोत, एकाच ध्येयाकडे मार्गक्रमण करत आहोत.

जर लालाजी, आपल्या शिष्याचा उत्कर्ष पाहण्यातील आनंदाप्रीत्यर्थ, आपला सर्वात महान शोध बहाल करू शकले आणि जर बाबूजी राधेच्या प्रेमाहूनही श्रेष्ठ प्रेम करू शकले, तर निश्चितच आपणही आपल्या सोबतच्या बंधू-भगिनींकडे स्नेहाचा हात पुढे करू शकतो, किरकोळ तक्रारी सोडून देऊ शकतो आणि आपल्यामध्ये जे ओतले गेले आहे, त्या दिव्यत्वासाठी सुयोग्य पात्र ठरू शकतो.

तेव्हा, तुमच्या हृदयाला आपल्या सद्गुरूंच्या प्रेमाचा स्पर्श होऊ दे, प्राणाहुती तुमच्या अस्तित्वाचा कायापालट घडवून आणू दे आणि तुम्ही तुमच्या स्वतःच्या परीने त्यांच्या महान वारशाचे जिवंत उदाहरण बनावेत, ही प्रार्थना!

प्रेम आणि प्रार्थनेसह,
*कमलेश*

*वसंत पंचमी, 23 जानेवारी, 2026*

*पूज्य श्री लालाजी महाराज यांच्या*
*153 व्या जयंतीनिमित्त संदेश*
*22, 23 आणि 24 जानेवारी 2026, कान्हा शांतिवनम्*



## पूज्य दाजी यांच्यासोबत मास्टरक्लासेस

तुम्ही हार्टफुलनेस ध्यानाची सुरुवात केव्हाही करू शकता! पूज्य दाजी यांच्यासोबत तीन भागांच्या मास्टरक्लास मालिकेत सामील व्हा. यामध्ये, हार्टफुलनेस ध्यानपद्धतीचे काय फायदे आहेत, तसेच तुमच्या दैनंदिन दिनचर्येत हार्टफुलनेस शिथिलीकरण, ध्यान, शुद्धीकरण आणि प्रार्थनेचा समावेश कसा करावा, हे दाजी स्पष्ट करून सांगतात. हे मास्टरक्लासेस विनामूल्य आहेत.

https://heartfulness.org/in-mr/masterclass/

## हार्टफुलनेस ध्यानपद्धतीचे सराव

हार्टफुलनेसच्या सरावांची अनुभूती घ्या व शिका - हार्टफुलनेस शिथिलीकरण, ध्यान, शुद्धीकरण व प्रार्थना.

https://heartfulness.org/in-mr/heartfulness-practices/

heartfulness
purity weaves destiny

